(२१)

# अमरावती महानगरपालिका, अमरावती

कार्यालय :- महानगरपालिका अमरावती.
जा. क्र. अमनपा/पर्यावि / १४८ /२०२४
दिनांक :-२१/१०/२०२४

प्रति,

१. सहाय्यक आयुक्त, झोन क्र. १,२,३,४ व ५
२. उपअभियंता, झोन क्र. १,२,३,४ व ५
३. सिस्टीम मॅनेजर
४. जनसंपर्क अधिकारी
५. कार्यालय अधिक्षक
६. बाजार व परवाना , अधिक्षक
७. अग्निशमन अधिक्षक
८. जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, झोन क्र. १,२,३,४ व ५

महानगरपालिका अमरावती.

विषय - **दिपावली निमित्त फटाके फोडणे व आतिषबाजीकरीता सामुदायिक फटाके फोडणेकरीता विशिष्ट जागेची (Community Fire Cracking place) निवड व इतर उपाययोजना करण्याबाबत.**

संदर्भ :- १. ध्वनी प्रदुषण नियम २०००, सुधारीत २०१७.
२. महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ३० जुन, २०१८.
३. मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र १७३/२०१० मध्ये निर्गमित आदेश.
४. कार्यालयीन आदेश जा.क्र. अमनपा/आयु/पर्या/ ७४/२०२१ दि. १८/०८/२१
५. मा. पोलीस उपायुक्त, अमरावती शहर यांचे पत्र जा. क्र.पोआअ/विशा/दिपावली दक्षता /२७७९ / २०२१ दि. ०१/११/२०२१.
६. कार्यालयीन आदेश जा.क्र. अमनपा/ आयु/पर्यावि/ १२१/२०२१ दि. ०२/११/२०२१

संगणक विभाग म.न.पा.
आ.क्र. 1018
दि. 28/10/24

मा. सर्वोच्च न्यायालय येथे दाखल करण्यात आलेल्या रिट पिटीशन क्र. 728/2015 दरम्यान मा. न्यायालयाने फटाके खरेदी / विक्री व आतिषबाजी फोडणेकरीता मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या असून उपरोक्त सुचनांचे पालन होण्याचे दृष्टीकोनातून महानगरपालिका क्षेत्रामध्ये वायु प्रदुषणाचे दुष्परिणाम, स्वच्छ हवेचा श्वास घेण्याचा मानवी हक्क लक्षात घेवून वैय्यक्तिक फटाके फोडण्यापेक्षा

Scanned with CamScanner

सामुदायिक फटाके फोडण्याकरीता विशिष्ट जागेची (community Fire cracking Place) निवड करण्याबाबत संदर्भ क्र. ५ अन्वये सुचित केले आहे. त्याअनुषंगाने दिवाळी उत्सवा दरम्यान आवश्यक कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ६ अन्वये विस्तृत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. (प्रत संलग्न) दि. ०१/११/२०२४ ते दि. ०३/११/२०२४ या कालावधीमध्ये आगामी दिवाळी उत्सव साजरा करण्यात येणार असून त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ६ अन्वये निर्गमीत आदेशानुसार आपल्या विभागाशी संबंधीत मुद्यांबाबत कार्यवाही करून कार्यपुर्ती अहवाल या विभागास उलटटपाली सादर करावा, जेणेकरून मा. न्यायालयास व शासनास विहित मुदतीत अहवाल सादर करणे सोईचे होईल.

(सहपत्र – संदर्भ क्र. ६ ची पत्र )

पर्यावरण संवर्धन अधिकारी
महानगरपालिका अमरावती.

प्रतिलीपी -

१. मा. आयुक्त, महानगरपालिका अमरावती यांचे माहितीकरीता सादर.
२. मा. अतिरिक्त आयुक्त (१ व २ ), महानगरपालिका अमरावती यांचे माहितीकरीता सादर.
३. उपायुक्त (१,२,३ व ४ ), महानगरपालिका अमरावती यांचे माहितीकरीता सस्नेह अग्रेषित.
४. सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका अमरावती, यांचे माहितीकरीता सस्नेह अग्रेषित.
५. वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता), महानगरपालिका अमरावती यांचे माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
६. विधी अधिकारी, महानगरपालिका अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

-स्वा/-
पर्यावरण संवर्धन अधिकारी
महानगरपालिका अमरावती.

Scanned with CamScanner

दिपावलीनिमित्त फटाके फोडणे व आतिषबाजीकरीता सामुदायिक फटाके फोडणेकरीता विशिष्ट जागेची (Community Fire Cracking place) निवड व ईतर उपाययोजना करण्याबाबत.

# अमरावती महानगरपालिका, अमरावती

**कार्यालय :- महानगरपालिका अमरावती.**
जा. क्र. अमनपा/आयु/पर्यावि /929 /२०२१
दिनांक :- 2/11 /२०२१

## आदेश :-

**वाचा :-** १. ध्वनी प्रदुषण नियम २०००, सुधारीत २०१७.
२. महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ३० जुन, २०१८.
३. मा. उच्च न्यायालय जनहित याचिका क्र १७३/२०१० मध्ये निर्गमित आदेश.
४. कार्यालयीन आदेश जा.क्र. अमनपा/आयु/पर्या/ ७४/२०२१ दि. १८/०८/२०२१
५. मा. पोलीस उपायुक्त , अमरावती शहर यांचे पत्र जा. क्र. पोआअ/विशा/दिपावली दक्षता /२७७९/ २०२१ दि. ०१/११/२०२१.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये दि. ०२/११/२०२१ ते ०६/११/२०२१ दरम्यान यावर्षी दिपावली उत्सव साजरा करण्यात येणार आहे. मागील ०२ वर्षापासून कोव्हीड रोगाचा प्रादुर्भाव पाहता अद्यापही कोरोना या संसर्गजन्य रोगाचा धोका कायम आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय येथे श्री. अर्जुन गोपाल व ईतर यांनी केंद्र सरकार व ईतर विरुध्द दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र. ७२८/२०१५ बाबत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी फटाके खरेदी / विक्री व अतिषबाजी फोडणेकरीता मार्गदर्शक सुचना पारीत केलेल्या आहेत.

सदर सुचनांचे पालन होण्याचे दृष्टीकोनातून सुचना क्र. ४.(४८.१५) नुसार महानगरपालिका क्षेत्रामध्ये वायु प्रदुषणाचे दुष्यपरिणाम, स्वच्छ हवेचा श्वास घेण्याचा मानवी हक्क लक्षात घेवून वैय्यक्तिक फटाके फोडण्यापेक्षा सामुदायिक फटाके फोडण्याकरीता विशिष्ट जागेची (community Fire cracking Place) निवड करण्याबाबत सुचित केले आहे.

- त्याकरीता आपले कार्यक्षेत्रामध्ये फटाके फोडणे व आतिषबाजीकरीता (community Fire cracking Place) सामुदायिक फटाके फोडण्याकरीताचे जागेची निवड करुन त्याबाबत नियोजन करावे. सदरचे क्षेत्र हे शांतता क्षेत्रापासून १०० मीटर पेक्षा अधिक अंतरावर असणे अपेक्षित आहे.
- जागेची निवड करीत असतांना नमुद ठिकाणी सुरक्षेबाबत अग्निशमन दल व ईतर सर्व आवश्यक उपाययोजना कराव्यात. तसेच, कोविड-१९ च्या अनुषंगाने सुध्दा उपाययोजना कराव्यात. निवड केलेल्या जागेबाबतची माहिती पोलीस प्रशासनास कळवावी.
- सुचना क्र. ९ नुसार व सन २०१९ चे मार्गदर्शक सुचनेनुसार कमी उत्सर्जन करणारे (Improved Crackes) व हिरवे फटाके (Green Crackers ) विक्री करण्यास परवानगी आहे. जोडलेले फटाके Joined Fire Crackers, Series Crackers, Laris ज्याच्यामूळे मोठया प्रमाणात हवा , आवाज आणि घनकचऱ्याच्या समस्या निर्माण होत असल्याने त्यांच्या विक्रीवर बंदी आहे. तसेच Barium salt हे रसायन असणारे फटाके विक्रीवर सुध्दा बंदी आहे. परवानाधारकांद्वारे फटाक्याची विक्री निर्देशाप्रमाणे व स्फोटक नियमांचे पुर्णपणे पालन करुन घ्यावयाचे असल्याने आपले स्तरावर तपासणी पथक तयार करण्यात यावे.



Scanned with CamScanner

- मर्यादीत ध्वनी पातळी Decible (sound) level असलेल्या फटाक्याच्या विक्रीलाच परवानगी आहे. रात्री १०.०० वाजेनंतर फटाके फोडण्यास पुर्णतः मनाई आहे. ध्वनी प्रदुषण नियमांचे उल्लंघन होणार नाही याकरीता आपले स्तरावर ध्वनी प्रदुषण मंडळाचे सहकार्याने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, याकरीता पथक तयार करण्यात यावे अशा सुचना संदर्भ क्र. ५ अन्वये प्राप्त आहेत.

ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम २०१७ च्या परीच्छेद ३(५) नुसार महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत शैक्षणिक संस्था, दवाखाने, न्यायालयाचे सभोवतालचे १०० मिटरचा परिसर शांतता क्षेत्र म्हणून संदर्भ क्र २ अन्वये घोषित करण्यात आले असून सद्यास्थितीत महानगरपालिका क्षेत्रात एकुण ५८१ शांतता क्षेत्र (झोन) घोषित करण्यात आले आहेत.

संदर्भ क्र. ३ अन्वये जनहित याचिका क्र. १७३/२०१० संदर्भात मा. उच्च न्यायालयाने दि. २४ जून २०१५ व दि. १०,११,१२ व १६ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रांमध्ये सार्वजनिक सण /उत्सव /समारंभ यासाठी उभारण्यात येणाऱ्या मंडप/पेंडॉल तपासणीबाबत तसेच ध्वनीप्रदुषण नियंत्रण संदर्भात आदेश निर्गमित केले आहे. सदरहु आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे आवश्यक असून त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ४ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच ध्वनी प्रदुषण नियम २००० ची अंमलबजावणी होण्याचे दृष्टीकोनातून झोननिहाय सहाय्यक आयुक्त यांचे नियंत्रणात व उपअभियंता यांचे अध्यक्षतेत, सहाय्यक अभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक, स्वास्थ निरिक्षक यांचे ध्वनी प्रदुषण तक्रार निवारण पथक गठीत करण्यात आले आहे.

संदर्भ क्र. ५ नुसार प्राप्त सुचनांचे अनुषंगाने पुढील प्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | निर्देश | संबंधीत अधिकारी / विभाग प्रमुख |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | - सण उत्सवाकरीता गठीत करण्यात आलेल्या ध्वनीप्रदुषण नियंत्रण समितीचे फलक, कार्यालयाचे दर्शनिय भागात लावण्यात आले असल्याची खातरजमा करावी.<br>- ध्वनीप्रदुषण संबंधीत तक्रारींची नोंद घेण्याकरीता स्वतंत्र्य नोंदवही अद्यावत ठेवण्यात यावी. | सहाय्यक आयुक्त झोन क्र. १,२,३,४ व ५ |
| २. | - आपले कार्यक्षेत्राअंतर्गत फटाके फोडणे व आतिषबाजीकरीता (community Fire cracking Place) सामुदायिक फटाके फोडण्याकरीताचे जागेची निवड करुन त्याबाबत नियोजन करावे. सदरची जागा हि शैक्षणिक संस्था, दवाखाने, न्यायालय, या शांतता क्षेत्रापासुन १०० मीटरपेक्षा जास्त अंतरावर असावी.<br>- सामुदायिक फटाके फोडणे व आतिषबाजी करीता निश्चित करण्यात आलेल्या जागेची माहिती (यादी) पोलीस विभागास, जनसंपर्क अधिकारी व अग्निशमन अधिक्षक यांचेकडे पाठविण्यात यावी.<br>- दिपावली उत्सवादरम्यान ध्वनी प्रदुषणा संबंधीत तक्रार प्राप्त झाल्यास, सदर तक्रारीची नोंद स्वतंत्रपणे ध्वनीप्रदुषण तक्रार नोंद रजिस्टर मध्ये घेण्यात यावी.<br>- प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने संबंधीत उपअभियंता / ध्वनी प्रदुषण नियंत्रण पथक यांनी तात्काळ कारवाई करून तक्रारीचे निराकरण करावे.<br>- रात्री १०.०० वाजेनंतर फटाके फोडण्यास पुर्णतः मनाई असल्याने ध्वनी प्रदुषण नियमांचे उल्लंघन होणार नाही याकरीता संदर्भ क्र. ४ अन्वये गठीत | उपअभियंता झोन क्र.१,२,३,४व ५ |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | पथकामार्फत योग्य ती कार्यवाही करावी. | |
| ३ | - जनसंपर्क अधिकारी यांनी प्राप्त सुचनांचे अनुषंगाने व्यापक जनजागृती होण्याकरीता स्थानिक वृत्तपत्र, प्रसार वाहिन्या याद्वारे प्रसिध्दी करावी.<br>- उपअभियंता झोन यांचेकडून सामुदायिक फटाके फोडण्याकरीता नियोजित करण्यात आलेल्या जागेची माहिती (यादी) स्थानिक वृतपत्र तसेच इतर प्रसार माध्यमाद्वारे प्रसिध्द करावी. | जनसंपर्क अधिकारी |
| ४. | - ध्वनी प्रदुषणा संबंधीत नागरीकांना तक्रार नोंदविण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेला टोलफ्री क्रमांक (१८००२३३६४५०) सुस्थितीत सुरु असल्याबाबतची खातरजमा करावी. तसेच टोलफ्री क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची नोंद घेण्याची व्यवस्था करावी. | कार्यालय अधिक्षक |
| ५. | - महानगरपालिका क्षेत्रातील सर्व फटाका विक्रेता यांना संदर्भ क्र. ५ चे पत्रान्वये प्राप्त सुचनांचे उल्लंघन होणार नाही याबाबत खबरदारी घेण्यासंदर्भात सुचित करण्यात यावे.<br>- परवानाधारकांद्वारे फटाक्याची विक्री निर्देशाप्रमाणे व स्फोटक नियमांचे पुर्णपणे पालन करुन घ्यावयाचे असल्याने याकरीता तपासणी पथक तयार करण्यात यावे व फटाका विक्री व्यवसायीकांची तपासणी करावी. | अधिक्षक बाजार व परवाना |
| ६. | - ध्वनी प्रदुषणा संबंधीत नागरीकांना तक्रार नोंदविण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेली SMS सुविधा सुस्थितीत सुरु असल्याची खातरजमा करावी.<br>- उपरोक्त निर्देशाबाबतची माहिती महानगरपालिकेचे संकेतस्थळावर प्रसिध्दी करावी. | सिस्टीम मॅनेजर |
| ७. | - उपअभियंता झोन यांचेकडून सामुदायीक फटाके फोडण्याकरीता नियोजित करण्यात आलेल्या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन दल / यंत्रणा कार्यान्वित ठेवावी. | अग्निशमन अधिक्षक |
| ८. | - सुचना क्र. ९ नुसार बंदी असलेले फटाके, परवाना धारक फटाका विक्रेत्याकडून विक्री करण्यात येवू नये याबाबत संबंधीतास निर्देशित करावे.<br>- कोविड-१९ च्या अनुषंगाने प्राप्त सुचनांचे पालन नागरीकांकडून होण्याचे दृष्टीने सुध्दा आवश्यक उपाययोजना कराव्यात. | जेष्ठ स्वास्थ निरिक्षक / स्वास्थ निरिक्षक |

सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पर्यावरण विभागास सादर करावा. उपरोक्त आदेश तात्काळ अमंलात येतील.

आयुक्त
महानगरपालिका अमरावती.

प्रत,

१. सहाय्यक आयुक्त, झोन क्र. १,२,३,४ व ५
२. उपअभियंता, झोन क्र. १,२,३,४ व ५
३. सिस्टीम मॅनेजर
४. जनसंपर्क अधिकारी
५. कार्यालय अधिक्षक
६. बाजार व परवाना , अधिक्षक

१२८ /D/Adesh

Scanned with CamScanner